महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र.वैशिप्र-१०१९/प्र.क्र.९५/नीट-युजी-२०१९/AHU/प्रथम निवड यादी/२०१९/ दिनांक:२६/०७/२०१९

प्रति,
अधिष्ठाता/ प्राचार्य,
सर्व शासकीय/खाजगी विनाअनुदानित/अनुदानित/अल्पसंख्यांक आयुर्वेद/युनानी/
होमिओपॅथी अभ्यासक्रमाची महाविद्यालये

**विषयः- नीट युजी - २०१९ राज्य स्तरीय कोटा प्रवेश आयुर्वेद/युनानी/ होमिओपॅथी प्रथम निवड यादी संबंधी महत्वाच्या सुचना.**

**संदर्भ :- राज्य सीईटी कक्षाकडील सूचना क्र. १७/१९९२, दिनांक १९/०७/२०१९**

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता नीट युजी - २०१९ या पात्रता प्रवेश परीक्षेव्दारे जाहिर केलेल्या गुणवत्ता यादीनुसार आरोग्य विज्ञान आयुर्वेद/युनानी/ होमिओपॅथी अभ्यासक्रमाची राज्यस्तरीय कोटयाची प्रथम निवड यादी दिनांक २६/०७/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर प्रवेश यादीनुसार विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या वेळी करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१) विद्यार्थी प्रवेशापूर्वी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नीट युजी - २०१९ च्या नियमावली पुस्तिकेचे अवलोकन करावे.

२) विद्यार्थी प्रवेशाकरीता संस्थास्तरावर जेष्ठ अध्यापकांची नियुक्ती करुन सदर प्रवेशासाठी समिती गठित करण्यात यावी. सदर समितीचे कार्यारंभ आदेश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास अवगत करावे.

३) सोबत आपल्या महाविद्यालयातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी जोडली आहे. सदर यादीतील विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयात दिनांक २७/०७/२०१९ ते दिनांक ०२/०८/२०१९ (सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) मुदत देण्यात आलेली आहे. **(सुट्टीचे दिवस धरुन)**

४) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत पाठविण्यात आलेल्या निवड यादीमध्ये दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवर्गानुसार संबंधित विद्यार्थ्यांकडे त्याच्या प्रवर्गाची योग्य कागदपत्रे उपलब्ध असणे बंधनकारक आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या यादीमध्ये दर्शविलेल्या प्रवर्गानुसार विद्यार्थ्यांकडे कागदपत्रे उपलब्ध नसल्यास अशा विद्यार्थ्यांबाबत तातडीने आयुक्त, राज्य सीईटी कक्षाकडून मार्गदर्शन घ्यावे.

५) सदर यादीमधील उमेदवारांना प्रवेश देताना त्यांच्या मुळ कागदपत्रांची छाननी/पडताळणी करणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी संवैधानिक आरक्षणाच्या प्रवर्गातून प्रवेशित झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांकडे जात प्रमाणपत्र (सर्व संवैधानिक आरक्षण असलेल्या विद्यार्थ्यांकडे), जात वैधता प्रमाणपत्र (SEBC प्रवर्ग सोडून सर्व संवैधानिक आरक्षण असलेल्या विद्यार्थ्यांकडे) आणि आवश्यक असल्यास नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (SC/ST सोडून सर्व विद्यार्थ्यांकडे) उपलब्ध असणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी संबंधित जात वैधता प्रमाणपत्र समितीकडे अर्ज केला असेल **(SC/ST/VJ/NT1/NT2/NT3/OBC/SBC) त्यांना दिनांक ०२/०८/२०१९ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्राशिवाय प्रवेश देण्यात येऊ नये.**

६) वरीलप्रमाणे प्रवेशाकरीता आवश्यक असलेली सर्व मुळ कागदपत्रे पुर्ण असल्याशिवाय विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये. योग्य कागदपत्रांशिवाय प्रवेश केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहिल.

७) आपल्या महाविद्यालयात/संस्थेस प्रवेशासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क व अन्य शुल्क दिनांक ०२/०८/२०१९ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत स्विकारणात यावे. शैक्षणिक शुल्क हे डिमांड ड्राफटच्या स्वरुपात स्विकारण्यात यावे. शनिवार आणि रविवार (सुट्टीच्या दिवशी) शैक्षणिक शुल्क धनादेशाव्दारे स्विकारण्यात यावे आणि विद्यार्थ्यांना दोन दिवसात डिमांड ड्राफट देण्यास सांगावे.

संबंधित महाविद्यालयातील रोखपालांनी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे शैक्षणिक शुल्क आणि इतर शुल्कापोटी वेगवेगळे दोन डी.डी. तो विद्यार्थी त्यांच्या महाविद्यालयातील प्रवेश निश्चित करेपर्यंत किंवा त्याने घेतलेला प्रवेश रद्द करेपर्यंत किंवा डी.डी.च्या वैध कालावधीपर्यंत आपल्याकडे ठेवून घ्यावेत. डी.डी. प्राप्त झाल्यानंतर फक्त डी.डी. ची पोच देण्यात यावी. प्रवेश निश्चित झाल्याशिवाय विद्यार्थ्यास शुल्काची पावती देण्यात येवू नये. विद्यार्थ्याने जर सदर महाविद्यालयातील प्रवेश रद्द करुन दुसऱ्या महाविद्यालयात प्रवेश घेतला तर नियमाप्रमाणे प्रवेश रद्द करण्याचे शुल्क (रुपये १५००/-) फक्त विद्यार्थ्याकडून रोख स्वरुपात घेवून त्याने जमा केलेले दोनही डी.डी. त्याला परत करण्यात यावेत.

८) आपल्या महाविद्यालयात उपरोक्त मुदतीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जर पुढील निवड फेरीत अन्य महाविद्यालयात प्रवेश बदल नको असल्यास अशा विद्यार्थ्यांसाठी राज्य सीईटी कक्षामार्फत देण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमध्ये स्टेटस रिटेंशन फॉर्म देण्यात आला आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांना पुढील निवड फेरीत प्रवेश नको असल्यास अशा विद्यार्थांनी दिनांक ०२/०८/२०१९ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत त्यांचे स्टेटस रिटेंशन अर्ज

भरुन ते आपल्या महाविद्यालयात सादर करावयाचे आहेत, तशा स्पष्ट सुचना विद्यार्थ्यांना द्याव्यात.

९) विद्यार्थी व पालकांमध्ये स्टेटस रिटेंशन फॉर्मबाबत बरेच संभ्रम आहेत. त्यामुळे आपण खालीलप्रमाणे सूचना विद्यार्थ्यांना स्टेटस रिटेंशन फॉर्म भरतेवेळी द्याव्यात, असे सूचित करण्यात येत आहे.

**"स्टेटस रिटेंशन फॉर्म म्हणजे जर विद्यार्थ्यास कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश मिळाला आणि त्या विद्यार्थ्यास जर पुढील निवड फेऱ्यांमध्ये प्रवेश बदल नको असेल तरच त्या विद्यार्थ्याने स्टेटस रिटेंशन फॉर्म भरणे गरजेचे असते. परंतु त्या विद्यार्थ्यास जर पुढील प्रवेश फेऱ्यांसाठी पात्र व्हायचे असेल तर त्याने स्टेटस रिटेंशन फॉर्म भरु नये. विद्यार्थ्याने निवड प्राप्त झालेल्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि स्टेटस रिटेंशन फॉर्म भरला नाही तरच तो पुढील फेऱ्यांमधील बदलांकरीता पात्र ठरतो. स्टेटस रिटेंशन फॉर्म भरला नाही तरीही त्याचा त्या महाविद्यालयातील प्रवेश पात्र होतो"**

तरी आपणांस कळविण्यात येते की, विद्यार्थी आपल्या महाविद्यालयात स्टेटस रिटेंशन फॉर्म सादर करावयास आल्यास त्याला उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे सुचित करावे व त्यानंतर त्याच्याकडून स्टेटस रिटेंशन फॉर्म भरुन घ्यावा. तसेच जे विद्यार्थी स्टेटस रिटेंशन फॉर्म सादर करणार नाहीत त्यांना पुढील प्रत्येक प्रवेश फेरीच्या वेळी त्यांच्या प्रवेशामध्ये बदल झाला आहे अथवा नाही याबाबत खातरजमा करुन घेण्याबाबत सुचना द्याव्यात.

१०) या प्रक्रियेत रुजू झालेले विद्यार्थी, रुजू न झालेले विद्यार्थी, प्रवेश रदद् कलेले विद्यार्थी आणि स्टेटस रिटेन्शन अर्ज सादर केलेले विद्यार्थी यांची एकत्रित माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याकरीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून संगणक प्रणाली तयार करण्यात आलेली आहे. सदर संगणक प्रणालीच्या वापराबाबत खालीलप्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

- प्रथम राज्य सीईटी कक्षाच्या www.mahacet.org या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठाच्या उजव्या बाजूला " College Feedback " या रखान्यामधील "College Feedback Module for Health Science UG Courses" अशी लिंक देण्यात आलेली असुन सदर लिंकवर क्लिक करावे.
- सदर लिंकवर क्लिक केल्यानंतर "Joined/Not Joined/Cancelled/Retention" अशी लिंक दिसेल.
- वरील पैकी सध्या "Joined/Not Joined/Cancelled/Retention" लिंकवर क्लिक करावे.
- तद्नंतर आपणांस " CET Name , Round No, User Name & Password" इ. माहिती आपल्या स्क्रिनवर दिसेल. सदरची योग्य माहिती भरुन "Proceed" वर क्लिक करावे.

- विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतची उक्त माहिती उक्त कालावधीमध्ये दैनंदिन सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत भरण्यात यावी.
- आपल्या संगणक स्क्रिनवर आपल्या संस्थेत प्रथम प्रवेश फेरीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. **आपल्या महाविद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अपलोड केलेले प्रमाणपत्र तपासावे व अपलोड नसलेले प्रमाणपत्र त्वरीत अपलोड करावे.** सदर यादीमध्ये "Joined/Not Joined/Cancelled/Retention" माहिती भरण्यात यावी व अद्ययावत करण्यात यावी. सदरची माहिती पुर्णपणे भरल्यानंतर सदरची माहिती अचुक भरली आहे का, याची खात्री करुन घ्यावी. सदर माहितीमध्ये आपणांस कोणताही बदल करावयाचा झाल्यास "Edit" म्हणून पर्याय आपणास उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर माहिती व्यवस्थितरीत्या भरणा केली आहे याची खात्री केल्यानंतर सदर माहितीचा अहवाल "Generate Report" बटणवर क्लिक करावा. जनरेट झालेल्या अहवालाच्या प्रत्येक पानावर अधिष्ठाता/ संस्था- प्रमुखांची स्वाक्षरी व महाविद्यालयाच्या मुद्रांक " College Stamp" घेण्यात यावा.
- स्वाक्षरी करण्यात आलेली माहिती स्कॅन करुन "Select File" या बटणाद्वारे "Select" करावी. तद्नंतर स्कॅन केलेली माहिती "Upload" बटनाद्वारे पुन्हा "Load" करावी. सदर माहिती "Load" झाल्यानंतर "Final Submission" या बटणावर क्लिक करुन संचालनालयास दिनांक ०२/०८/२०१९ रोजी सायंकाळी ०७:३० वाजेपर्यंत सादर करावी. तसेच सदरहू माहितीची एक प्रत राज्य सीईटी कक्षाच्या **maharashtra.cetcell@gmail.com** या ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावी.

११) अ) शासन निर्णय क्र. एमईडी १०१६/प.क्र.४७३/१६/शिक्षण-२ , दिनांक ०३ मे २०१८ अन्वये जे उमेदवार आर्थिक दृष्टया मागास संवर्गातील म्हणजेच ज्यांच्या पालकांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रुपये ८ लाखापेक्षा कमी आहे, अशा खुल्या संवर्गातील उमेदवारांकडून, तसेच ब) शासन निर्णय क्र. सीबीसी-२०१९/प्र.क्र. १०८/मावक, दिनांक ११ जुलै, २०१९ अन्वये सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील (एसईबीसी) उमेदवारांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी रक्कम शैक्षणिक शुल्क म्हणून आकारण्यात यावी. अशा उमेदवारांना शासनाच्या "राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजने अंतर्गत" ५० टक्के शैक्षणिक शुल्क प्राप्त होणार आहे. सदरील उमेदवारांकडून प्रवेशाच्या वेळी शैक्षणिक शुल्काच्या संपुर्ण रक्कमेचा भरणा करण्याबाबत आग्रह धरु नये, प्रवेशाच्यावेळी संपुर्ण शैक्षणिक शुल्काच्या रक्कमेचा आग्रह धरल्यास व तशी मागणी केल्यास महाविद्यालया विरोधात कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. क) इतर प्रवर्गाच्या बाबतील संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे दिनांक १२/०७/२०१९ रोजीच्या पत्रानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१२) महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या रॅगिंग सदृश्य प्रकारांमध्ये झालेली वाढ लक्षात घेता अशा प्रकारांवर आळा घालण्याकरीता भारतीय आयुर्विज्ञान परिषदेमार्फत दिनांक २१/०२/२००९ आणि दिनांक ०३/०८/२००९ च्या पत्रानुषंगाने मार्गदर्शकतत्त्वे निर्धारित केली असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. आपणांस कळविण्यात येते की, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे आवश्यकती सर्व कार्यवाही आपल्यास्तरावर अचूकपणे होणे अत्यंत आवश्यक आहे. या व्यतिरिक्त रॅगिंग प्रतिबंध करावयाच्या दृष्टीने आवश्यकती कार्यवाही करण्याबाबतचे पत्र आणि शासनाच्या परिपत्रकाची प्रत सोबत जोडली असून आपल्या महाविद्यालयात रॅगिंग प्रतिबंधक करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त बाबत प्राधान्याने व कटाक्षाने कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

**सही/-**
**(आनंद ए.रायते)** भाप्रसे
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर,**

१) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा.कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३) मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
५) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई